ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 26 ] [ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 4

Total No. of Questions : 26 ] [ Total No. of Printed Pages : 4

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 450-M (RS)**

**Code No. : 450-M (RS)**

# ಡಿ.ಎಲ್.ಎಡ್. ದ್ವಿತೀಯ ವರ್ಷ

# D.El.Ed. SECOND YEAR

# ಕಲಿಕೆಯನ್ನು ಅನುಕೂಲಿಸುವುದು (ಹಿ.ಪ್ರಾ.ಶಾ.)

# ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ – ಮರಾಠಿ

# FACILITATING LEARNING ( HPS )

# FIRST LANGUAGE — MARATHI

**(ಪರಿಷ್ಕೃತ ಪಠ್ಯವಸ್ತು)**

**(Revised Syllabus)**

ದಿನಾಂಕ : 12. 10. 2020 ]

Date : 12. 10. 2020 ]

ಸಮಯ : ಬೆಳಿಗ್ಗೆ 10.00 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1.00 ರವರೆಗೆ ] [ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 60

Time : 10.00 A.M. to 1.00 P.M. ] [ Max. Marks : 60

*ಅಭ್ಯರ್ಥಿಯ ನೋಂದಣಿ ಸಂಖ್ಯೆ*

*Register Number of the Candidate* [ ]

***सामान्य सूचना :*** प्रत्येक प्रश्नाचे उत्तर दिलेल्या सूचनांप्रमाणे लिहीणे आवश्यक आहे.

**भाग - I**

I. खालील प्रश्नाना **चार** बहुपर्यायी उत्तरे दिलेली आहेत. त्यातील योग्य ते उत्तर निवडुन लिहा. प्रत्येक प्रश्नाला एक गुण आहे. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर लिहीणे आवश्यक आहे : 10 × 1 = 10

1. मानवाच्या मानसिक कृतीना, आलोचनाना आकृतीरूप देणे आणि मार्गदर्शन करणे म्हणजेच –

   (अ) सामाजिक व्यवस्था (आ) भाषा व्यवस्था

   (इ) विचार व्यवस्था (ई) कार्य व्यवस्था.

2. शिक्षकाजवळ शब्द भांडार इतका असावा –

   (अ) साधारण (आ) मर्यादित

   (इ) विपुल (ई) ज्ञान देण्यापुरता.

3. मुलाला ज्या संधी आणि अध्ययनाचे मार्ग मिळतात त्यामध्ये अधिकाधिक संधी आणि अध्ययनाचे मार्ग यांच्याकडून मिळतात –

(अ) मित्रांकडून आणि शिक्षकांकडून (आ) शेजाऱ्यांकडून

(इ) पालकांकडून (ई) मुख्याध्यापकांकडून.

4. प्रारंभी मुलाला अध्ययन माध्यम म्हणून मुलाची मातृभाषा नसल्यास हे होते.

(अ) अध्ययन सुलभ होते (आ) भाषेचा विकास होतो

(इ) मुलाचा उत्साह वाढतो (ई) मलाचा उत्साह कमी होतो.

5. शिक्षक मुलाच्या घरच्या भाषेबद्दल असे असावेत –

(अ) तिरस्कार करणारे (आ) स्वीकार करणारे

(इ) गौरव करणारे (ई) अपमान करणारे.

6. पाठाच्या पायऱ्यांमध्ये महत्वाची पायरी ही आहे –

(अ) विवरण करणे (आ) परिशोध घेणे

(इ) मूल्यमापन करणे (ई) दृढीकरण करणे.

7. मौखिक अभिव्यक्ती विकसित करण्यास कृत्ती देताना या गोष्टी लक्षात ठेवाव्यात –

(अ) मुले संभाषण करत असताना त्याचे प्रत्याभरण करावे

(आ) शिक्षकांने स्वतः मौखिक अभिव्यक्तीचा उत्तम नमुना द्यावा

(इ) सर्व चुका एकाचवळी निदर्शनास आणून द्याव्यात

(ई) मुलाला आपला अभिप्राय समजून घेण्यास संधी देवू नये.

8. आशुभाषण म्हणजे हे होय –

(अ) दिलेल्या वेळेत, दिलेल्या विषयाबद्दल बोलणे

(आ) जास्त तयारी करुन बोलणे

(इ) तयारी नसताना बोलणे

(ई) अचानक बोलणे.

9. भाषा कौशल्याची दुसरी पायरी –

(अ) वाचन (आ) श्रवण

(इ) लेखन (ई) भाषण.

10. समर्थ वाचक हा असा असतो –

(अ) अर्थ समजून न घेता केवल वाचन करतो

(आ) वाचन करताना त्याच्या चिंतनाबाबत प्रज्ञापूर्वक विचार करतो

(इ) त्यात असणारी समस्या ओळखत नाही

(ई) अडखळत वाचन करतो.

## भाग - II

II. खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर किमान अर्धे पृष्ठ असावे. ( प्रत्येक प्रश्नाला **दोन** गुण ) : $5 \times 2 = 10$

11. साहित्याचे विविध प्रकार सांगा.
12. भाषा शिक्षकात आवश्यक दोन गुणलक्षणे सांगा.
13. रचनावादी सिद्धांताधारित 5E च्या पायऱ्या सांगा. यातील महत्वाची पायरी कोणती ?
14. तुम्ही शाळेत एक शिक्षक या नात्याने भाषण स्पर्धेचे नियोजन कसे कराल ?
15. मुलांना कथा सांगण्यापूर्वी शिक्षकांने कोणती तयारी करावी ?
16. वाचन आणि लेखन यातील संबंध स्पष्ट करा.
17. निबंध आणि प्रबंध यातील दोन फरक सांगा.
18. शिक्षक या नात्याने तुम्ही मुलांना वाचन करण्यास कसे प्रोत्साहन द्याल ?

## भाग - III

III. खालील प्रत्येक प्रश्नाला निवड दिलेली आहे. त्यातील एका प्रश्नाचे उत्तर लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर किमान एक पृष्ठ असावे. ( प्रत्येक प्रश्नाला **पाच** गुण ) : $8 \times 5 = 40$

19. अ) भाषा अध्ययनात शिक्षकाची आणि विद्यार्थ्यांची भुमिका स्पष्ट करा.

**किंवा**

आ) भाषा अध्ययनामुळे इतर विषयांच्या अध्ययनात मदत होते. सविस्तर सांगा.

20. अ) "भाषा हे सृजनशील अभिव्यक्तीचे माध्यम आहे." कसे ते स्पष्ट करा.

**किंवा**

आ) भाषा वर्गात मुलांना व्याकरण अध्यापन कसे करावे ? स्पष्ट करा.

21. अ) भाषा अध्ययन पद्धतीमधील विषय आधारीत व क्रिया आधारीत पद्धत स्पष्ट करा.

**किंवा**

आ) भाषा अध्ययनाचे मूल्यमापन करताना तुम्ही शिक्षक या नात्याने कोणत्या गोष्टी ळक्षात ठेवाल ?

22. अ) तुमच्या शाळेच्या बाजूला असलेल्या गटारीमध्ये पाणी साचून दुघंधी निर्माण झाली आहे. तेंव्हा तेथील संबंधीत ग्रामपंचायत, नगरपालीकेला गटार स्वच्छ करण्याबाबत विनंती अर्ज तयार करा.

**किंवा**

आ) बहुभाषा वर्गात मुलांचा भाषिक विकास होतो. समर्थन करा.

23. अ) श्रवणकृतीचे संघटन करण्याच्या पद्धतीचे स्पष्टीकरण करा.

**किंवा**

आ) श्रवणातून आनंद मिळविण्यासाठी शाळेत कोणकोणते उपक्रम राबविता येतील ? विवरण द्या.

24. अ) 'श्रवण कौशल्य हे भाषा शिक्षणाचा पाया आहे.' स्पष्ट करा.

**किंवा**

आ) इयत्ता 5 वी ते 7 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या भाषण कौशल्याच्या विकासासाठी तुम्ही शिक्षक या नात्याने कोणते कार्यक्रम शाळेत राबवाल ?

25. अ) तुम्ही एक शिक्षक या नात्याने विद्यार्थ्यांना एक उत्तम वाचक बनण्यास कोणती अनुकुलता निर्माण करुन द्याल ?

**किवा**

आ) तुम्ही एक शिक्षक या नात्याने वाचनाचे मूल्यमापन कसे कराल ?

26. अ) लेखन प्रक्रियेच्या पाच पायऱ्या सविस्तर सांगा.

**किंवा**

आ) मुलांचे हस्ताक्षर सुधारण्यासाठी शाळेत शिक्षकांने कोणते उपक्रम योजले पाहिजेत ?